श्रीमद् भागवत का यह सार
भगवद् भक्ति ही आधार

श्रीमद्भागवत रसिक कुटुंब

कपिल गीता अध्याय(3.32)



वर्णन करने सांख्य योग का, और देने को ज्ञान ।
गुरु रूप में कपिल मुनि थे, देवहूति शिष्य समान।

नारायणं(न्) नमस्कृत्य, नरं(ञ्) चैव नरोत्तमम्।
देवीं(म्) सरस्वतीं(वँ) व्यासं(न्), ततो जयमुदीरयेत्

नामसङ्कीर्तनं(यँ) यस्य, सर्वपापप्रणाशनम्।
प्रणामो दुःखशमनस्, तं(न्) नमामि हरिं(म्) परम्

श्रीमद्भागवतमहापुराणम्
तृतीयं स्कंधः
॥ अथ द्वात्रिं(म्)शोऽध्यायः ॥

कपिल उवाच
अथ यो गृहमेधीयान् ,धर्मानेवावसन् गृहे ।
काममर्थं(ञ्) च धर्मान् स्वान् , दोग्धि भूयः(फ्) पिपर्ति तान् ॥ 1॥

स चापि भगवद्धर्मात्- काममूढः(फ्) पराङ्मुखः ।
यजते क्रतुभिर्देवान्, पितॄं(म्)श्च श्रद्धयान्वितः ॥ 2॥

श्रीकपिल म्हणतात - हे माते, जो पुरुष वासना राहून सकामभावाने गृहस्थ धर्माचे पालन करतो आणि त्याचे फळ म्हणून अर्थ आणि काम यांचा उपभोग घेऊन पुन्हा पुन्हा तेच करीत राहातो, तो निरनिराळ्या कामनांनी

मोहित झाल्याकारणाने भगवद्धर्मापासून विन्मुख होतो आणि श्रद्धा यज्ञांनी देव आणि पितर यांचीच आराधना करीत राहातो.

तच्छ्रद्धयाक्रान्तमतिः(फ्), पितृदेवव्रतः(फ्) पुमान् ।

गत्वा चान्द्रमसं(लँ) लोकं(म्), सोमपाः(फ्) पुनरेष्यति ॥ 3॥

त्याची बुद्धी त्याच प्रकारच्या श्रद्धेशी निगडित राहाते. देव आणि पितर हेच त्याचे उपास्य होत. म्हणून तो चंद्रलोकात जाऊन सोमपान करतो आणि पुन्हा पुण्य क्षीण झाल्यावर या लोकात परत येतो.

यदा चाहीन्द्रशय्यायां(म्), शेतेऽनन्तासनो हरिः ।

तदा लोका लयं(यँ) यान्ति, त एते गृहमेधिनाम् ॥ 4॥

त्याची बुद्धी त्याच प्रकारच्या श्रद्धेशी निगडित राहाते. देव आणि पितर हेच त्याचे उपास्य होत. म्हणून तो चंद्रलोकात जाऊन सोमपान करतो आणि पुन्हा पुण्य क्षीण झाल्यावर या लोकात परत येतो.

ये स्वधर्मान्न दुह्यन्ति, धीराः(ख्) कामार्थहेतवे ।

निः(स्)संङ्गा न्यस्तकर्माणः(फ्), प्रशान्ताः(श्) शुद्धचेतसः ॥ 5॥

निवृत्तिधर्मनिरता, निर्ममा निरहङ्कृताः ।

स्वधर्माख्येन सत्त्वेन, परिशुद्धेन चेतसा ॥ 6॥

जे विवेकी मनुष्य आपल्या धर्माचा अर्थ आणि कामासाठी उपयोग करीत नाहीत, तर भगवंतांच्या प्रसन्नतेसाठीच त्याचे पालन करतात, ते अनासक्त, प्रशांत, शुद्धचित्त, निवृत्तिधर्मपरायण, ममतारहित आणि अहंकारशून्य पुरुष स्वधर्मपालनरूप सत्त्वगुणामुळे पूर्णपणे शुद्धचित्त होतात.

सूर्यद्वारेण ते यान्ति, पुरुषं(वँ) विश्वतोमुखम् ।

परावरेशं(म्) प्रकृति-मस्योत्पत्त्यन्तभावनम् ॥ 7॥

ते शेवटी सूर्यमार्गाने (अर्चिर्मार्ग किंवा देवयान मार्ग) सर्वव्यापी कार्यकारणरूप जगाचा नियंता, संसाराचे उपादान-कारण आणि त्याची उत्पत्ती, पालन व संहार करणाऱ्या पूर्णपुरुषालाच प्राप्त होतात.

द्विपरार्द्धावसाने यः(फ्), प्रलयो ब्रह्मणस्तु ते ।

तावदध्यासते लोकं(म्), परस्य परचिन्तकाः ॥ 8॥

जे लोक परमात्मदृष्टीने हिरण्यगर्भाची उपासना करतात. ते दोन परार्धांनी होणाऱ्या ब्रह्मदेवाच्या प्रलयापर्यंत त्यांच्या सत्यलोकातच राहातात.

क्ष्माम्भोऽनलानिलवियन्मन इन्द्रियार्थ-

भूतादिभिः(फ्) परिवृतं(म्) प्रतिसञ्जिहीर्षुः ।

अव्याकृतं(वँ) विशति यर्हि गुणत्रयात्मा,

कालं(म्) पराख्यमनुभूय परः(स्) स्वयम्भूः ॥ 9॥

एवं(म्) परेत्य भगवन्तमनुप्रविष्टा,

ये योगिनो जितमरुन्मनसो विरागाः ।

तेनैव साकममृतं(म्) पुरुषं(म्) पुराणं(म्),

ब्रह्म प्रधानमुपयान्त्यगताभिमानाः ॥ 10॥

ज्यावेळी देवतांपेक्षाही श्रेष्ठ ब्रह्मदेव आपल्या दोन परार्ध कालपर्यंत अधिकार भोगून पृथ्वी, जल, अग्नी, वायू, आकाश, मन, इंद्रिये, त्यांचे विषय आणि अहंकारादिसहित संपूर्ण विश्वाचा संहार करण्याच्या इच्छेने त्रिगुणात्मक प्रकृतीबरोबर एकरूप होऊन निर्विशेष परमात्म्यामध्ये लीन होऊन जातो, त्यावेळी प्राण आणि मन यांना जिंकलेले ते विरक्त योगीजनसुद्धा देहाचा त्याग करून त्या भगवान ब्रह्मदेवातच प्रवेश करतात. आणि पुन्हा त्यांच्याच बरोबर परमानंदस्वरूप पुराणपुरुष परब्रह्मामध्ये लीन होऊन जातात. त्याअगोदर ते भगवंतात लीन होत नाहीत, कारण त्यांच्यामध्ये अहंकार शिल्लक असतो.

अथ तं(म्) सर्वभूतानां(म्), हृत्पद्मेषु कृतालयम् ।

श्रुतानुभावं(म्) शरणं(व्ँ), व्रज भावेन भामिनि ॥ 11॥

म्हणून हे माते, आता तूसुद्धा अत्यंत भक्तिभावाने समस्त प्राण्यांच्या हृदयकमलांत असणाऱ्या त्या श्रीहरींच्याच चरणांना शरण जा. तूसुद्धा माझ्याकडून त्यांचा प्रभाव ऐकलाच आहेस.

आद्यः(स्) स्थिरचराणां(यँ) यो, वेदगर्भः(स्) सहर्षिभिः ।

योगेश्वरैः(ख्) कुमाराद्यैः(स्), सिद्धैर्योगप्रवर्तकैः ॥ 12॥

भेददृष्ट्याभिमानेन, निःसङ्गेनापि कर्मणा ।

कर्तृत्वात्सगुणं(म्) ब्रह्म, पुरुषं(म्) पुरुषर्षभम् ॥ 13॥

स सं(म्)सृत्य पुनः(ख्) काले, कालेनेश्वरमूर्तिना ।

जाते गुणव्यतिकरे, यथापूर्वं(म्) प्रजायते ॥ 14॥

वेदांचे अंतरंग जाणणारे, सर्व स्थावर-जंगम प्राण्यांचे आदिकारण ब्रह्मदेवसुद्धा मरीची आदि ऋषी, योगेश्वर, सनकादिक तसेच योगप्रवर्तक सिद्धांसहित निष्काम कर्मांमुळे आदिपुरुष पुरुषश्रेष्ठ सगुण ब्रह्माला प्राप्त होऊनसुद्धा भेददृष्टी आणि कर्तृत्वाभिमान यांमुळे भगवद्-इच्छेने, जेव्हा सृष्टी उत्पन्न होण्याची वेळ येते, तेव्हा कालरूप ईश्वराच्या प्रेरणेने गुणांमध्ये क्षोभ झाल्याने पुन्हा पूर्ववत प्रगट होतात.

ऐश्वर्यं(म्) पारमेष्ठ्यं(ञ्) च, तेऽपि धर्मविनिर्मितम् ।

निषेव्य पुनरायान्ति, गुणव्यतिकरे सति ॥ 15॥

अशा प्रकारे पूर्वोक्त ऋषीसुद्धा आपापल्या कर्मानुसार ब्रह्मलोकाचे ऐश्वर्य उपभोगून भगवद्-इच्छेने गुणांमध्ये क्षोभ झाल्याने पुन्हा या लोकात जन्म घेतात.

ये त्विहासक्तमनसः(ख्), कर्मसु श्रद्धयान्विताः ।

कुर्वन्त्यप्रतिषिद्धानि, नित्यान्यपि च कृत्स्नशः ॥ 16॥

रजसा कुण्ठमनसः(ख), कामात्मानोऽजितेन्द्रियाः ।

पितॄन् यजन्त्यनुदिनं(ङ्), गृहेष्वभिरताशयाः ॥ 17॥

जे या लोकात कर्मांमध्ये आसक्त राहून श्रद्धा सांगितलेल्या काम्य आणि नित्य कर्मांचे यथाविधी अनुष्ठान करतात, रजोगुणामुळे ज्यांची बुद्धी (विवेकशक्ती) नष्ट होते, ज्यांच्या हृदयामध्ये कामना असमान असते, ज्यांच्या स्वाधीन नसतात, ते आपल्या धर्मानुसार होऊन नेहमी पितरांची पूजा करतात.

त्रैवर्गिकास्ते पुरुषा, विमुखा हरिमेधसः ।

कथायां कथनीयोरु-विक्रमस्य मधुद्विषः ॥ 18॥

हे लोक धर्म, अर्थ आणि काम यांमध्येच रमाण असतात, म्हणून ज्यांचे महान पराक्रम अत्यंत दुष्कर आहेत, त्या भवभयहारी श्रीमधुसूदन भगवंतांच्या कथेपासून विन्मुखच असतात.

नूनं(न्) दैवेन विहता, ये चाच्युतकथासुधाम् ।

हित्वा शृण्वन्त्यसद्गाथाः(फ्), पुरीषमिव विड्भुजः ॥ 19॥

विष्ठा खाणारी कुत्री-कुत्रे इत्यादी जशी विष्ठेची अपेक्षा करतात, त्याप्रमाणे जे मनुष्य भगवत्कथामृत सोडून निंदनीय विषयवार्तांच ऐकतात, ते निश्चयच दुर्दैवी होत.

दक्षिणेन पथार्यम्णः(फ्), पितृलोकं व्रजन्ति ते ।

प्रजामनु प्रजायन्ते, श्मशानान्तक्रियाकृतः ॥ 20॥

गर्भाधानापासून अंत्येष्टीपर्यंत सर्व संस्कार करणारे लोक दक्षिण दिशेकडील पितृयान किंवा धूममार्गाने पितृ-ईश्वर असणाऱ्या अर्यमाच्या लोकात जातात आणि तेथून आपल्याच संततीच्या वंशामध्ये उत्पन्न होतात.

ततस्ते क्षीणसुकृताः(फ्), पुनर्लोकमिमं(म्) सति ।

पतन्ति विवशा देवैः(स्), सद्यो विभ्रंश(म्)शितोदयाः ॥ 21॥

हे माते, पितृलोकातील भोग भोगल्यानंतर जेव्हा पुण्य क्षीण होते, तेव्हा देवता त्यांना तेथील ऐश्वर्यापासून च्युत करतात आणि पुन्हा त्यांना लाचार होऊन ताबडतोब या लोकात येऊन पडावे लागते.

तस्मात्त्वं(म्) सर्वभावेन, भजस्व परमेष्ठिनम् ।

तद्गुणाश्रयया भक्त्या, भजनीयपदाम्बुजम् ॥ 22॥

म्हणून हे माते, ज्यांचे चरणकमल नेहमी भक्ती करण्यायोग्य आहेत, त्या भगवंतांचेच तू त्यांच्या गुण-आश्रय करणाऱ्या भक्तीने सर्वभावाने भजन कर.

वासुदेवे भगवति, भक्तियोगः(फ्) प्रयोजितः ।

जनयत्याशु वैराग्यं(ञ्), ज्ञानं(यँ) यद्ब्रह्मदर्शनम् ॥ 23॥

भगवान वासुदेवांविषयीचा भक्तियोग ताबडतोब वैराग्य आणि ब्रह्मसाक्षात्काररूप ज्ञानाची प्राप्ती करून देतो.

यदास्य चित्तमर्थेषु, समेष्विन्द्रियवृत्तिभिः ।

न विगृह्णाति वैषम्यं(म्), प्रियमप्रियमित्युत ॥ 24॥

स तदैवात्मनाऽऽत्मानं(न्), निःसङ्गं(म्) समदर्शनम् ।

हेयोपादेयरहित-मारूढं(म्) पदमीक्षते ॥ 25॥

जेव्हा इंद्रियांच्या वृत्तीमुळे भगवद्भक्ताचे चित्त राहून प्रिय-अप्रिय अशा विषमतेचा अनुभव करीत नाही, त्यावेळीच तो भक्त निःसंग, सर्वांमध्ये समान असणारा, त्याग आणि ग्रहण यांनी रहित अशा ब्रह्मपदावर आरूढ झाल्याचा साक्षात्कार करून घेतो.

ज्ञानमात्रं(म्) परं(म्) ब्रह्म, परमात्मेश्वरः(फ्) पुमान् ।

दृश्यादिभिः(फ्) पृथग्भावैर्- भगवानेक ईयते ॥ 26॥

तोच ज्ञानस्वरूप, तोच परब्रह्म, तोच परमात्मा, तोच ईश्वर, तोच पुरुष, तोच एक भगवंत, स्वतः जीव, विषय, इंद्रिये इत्यादी अनेक रूपांत प्रतीत होतो.

एतावानेव योगेन, समग्रेणेह योगिनः ।

युज्यतेऽभिमतो ह्यर्थो, यदसङ्गस्तु कृत्स्नशः ॥ 27॥

या संसाराविषयी आसक्तीचा संपूर्ण नाश होणे, हेच मोक्षाच्या सर्व प्रकारच्या योगसाधनेचे एकमात्र इष्ट फळ आहे.

ज्ञानमेकं(म्) पराचीनै-रिन्द्रियैर्ब्रह्म निर्गुणम् ।

अवभात्यर्थरूपेण, भ्रान्त्या शब्दादिधर्मिणा ॥ 28॥

ब्रह्म एक आहे, ज्ञानस्वरूप आणि निर्गुण आहे, तरीसुद्धा ते बाहेर भासणाऱ्या इंद्रियांमुळे भ्रमाने शब्द इत्यादी पदार्थांच्या रूपात भासते.

यथा महानहं(म्) रूप-स्त्रिवृत्पञ्चविधः(स्) स्वराट् ।

एकादशविधस्तस्य, वपुरण्डं(ञ्) जगद्यतः ॥ 29॥

ज्याप्रमाणे एकच परब्रह्म महत्तत्त्व, सात्त्विक, राजस आणि तामस असा तीन प्रकारचा अहंकार, पंचमहाभूते आणि अकरा इंद्रिये या रूपांनी बनले आहे आणि तेच स्वयंप्रकाशी जीव आहे. त्याचप्रमाणे त्या जीवाचे शरीररूप हे ब्रह्मांडसुद्धा ब्रह्मच आहे. कारण ब्रह्मापासूनच याची उत्पत्ती झाली आहे.

एतद्वै श्रद्धया भक्त्या, योगाभ्यासेन नित्यशः ।

समाहितात्मा निःसङ्गो, विरक्त्या परिपश्यति ॥ 30॥

परंतु जो श्रद्धा, भक्ती आणि वैराग्य तसेच निरंतर योगाभ्यास यांमुळे एकाग्रचित्त आणि अनासक्त झालेला आहे, तोच याला ब्रह्मरूपात पाहू शकतो.

इत्येतत्कथितं(ङ्) गुर्वि, ज्ञानं(न्) तद्ब्रह्मदर्शनम् ।

येनानुबुद्ध्यते तत्त्वं(म्), प्रकृतेः(फ्) पुरुषस्य च ॥ 31॥

हे पूजनीय माते, मी तुला हे ब्रह्मसाक्षात्काराचे साधनरूप ज्ञान ऐकविले. याच्याद्वारा प्रकृती आणि पुरुषाच्या यथार्थस्वरूपाचा बोध होतो.

ज्ञानयोगश्च मन्निष्ठो, नैर्गुण्यो भक्तिलक्षणः ।

द्वयोरप्येक एवार्थो, भगवच्छब्दलक्षणः ॥ 32॥

हे देवी, निर्गुण-ब्रह्मविषयक ज्ञानयोग आणि माझ्याविषयीचा भक्तियोग, या दोन्हींचे फळ एकच आहे. त्यालाच भगवंत म्हणतात.

यथेन्द्रियैः(फ्) पृथग्द्वारै- रर्थो बहुगुणाश्रयः ।

एको नानेयते तद्वद्- भगवान् शास्त्रवर्त्मभिः ॥ 33॥

जसे रूप, रस, गंध इत्यादी अनेक गुणांचा आश्रय असणारा एकच पदार्थ भिन्न-भिन्न इंद्रियांच्याद्वारा विभिन्नरूपाने अनुभवास येतो, तसेच शास्त्राच्या वेगवेगळ्या मार्गांनी एकाच भगवंतांची अनेक प्रकारांनी अनुभूती येते.

क्रियया क्रतुभिर्दानैस्- तपः(स्)स्वाध्यायमर्शनैः ।

आत्मेन्द्रियजयेनापि, सं(न्)न्यासेन च कर्मणाम् ॥ 34॥

योगेन विविधाङ्गेन, भक्तियोगेन चैव हि ।

धर्मेणोभयचिह्नेन, यः(फ्) प्रवृत्तिनिवृत्तिमान् ॥ 35॥

आत्मतत्त्वावबोधेन, वैराग्येण दृढेन च ।

ईयते भगवानेभिः(स्), सगुणो निर्गुणः(स्) स्वदृक् ॥ 36॥

अनेक प्रकारची कर्मे, यज्ञ, दान, तप, वेदाध्ययन, वेदविचार, मन आणि इंद्रियांचा संयम, कर्माचा त्याग, विविध अंगे असलेला योग, भक्तियोग, प्रवृत्तिमार्ग आणि निवृत्तिमार्ग (असे) दोन्ही प्रकारचे धर्म, आत्मतत्त्वाचे ज्ञान आणि दृढ वैराग्य या सर्व साधनमार्गांनी सगुण-निर्गुणरूप स्वयंप्रकाश भगवंतालाच प्राप्त केले जाते.

प्रावोचं(म्) भक्तियोगस्य, स्वरूपं(न्) ते चतुर्विधम् ।

कालस्य चाव्यक्तगतेर्- योऽन्तर्धावति जन्तुषु ॥ 37॥

सात्त्विक, राजस, तामस आणि निर्गुणभेदाने चार प्रकारच्या भक्तियोगाचे आणि जो प्राण्यांच्या जन्मादी विकारांचा हेतू आहे, तसेच ज्याची गती जाणता येत नाही, त्या काळाचे स्वरूप मी तुला सांगितले.

जीवस्य सं(म्)सृतीर्बह्वी-रविद्याकर्मनिर्मिताः ।

यास्वङ्ग प्रविशन्नात्मा, न वेद गतिमात्मनः ॥ 38॥

हे देवी, अज्ञानाने कर्म केल्याने जीवाला ज्या अनेक गती प्राप्त होतात, तेथे गेला असता तो आपल्या स्वरूपाला जाणू शकत नाही.

नैतत्खलायोपदिशेन्- नाविनीताय कर्हिचित् ।

न स्तब्धाय न भिन्नाय, नैव धर्मध्वजाय च ॥ 39॥

मी तुला जो ज्ञानाचा उपदेश केला आहे, तो दुष्ट, उद्धट, घमेंडखोर, दुराचारी आणि दांभिक पुरुषांना कधीही करू नये.

न लोलुपायोपदिशेन्-नगृहारूढचेतसे ।

नाभक्ताय च मे जातु, न मद्भक्तद्विषामपि ॥ 40॥

जो विषयलोलुप आहे, गृहासक्त आहे, माझा भक्त नाही किंवा माझ्या भक्तांचा द्वेष करणारा आहे, त्याला सुद्धा याचा उपदेश कधी करू नये.

श्रद्दधानाय भक्ताय, विनीतायानसूयवे ।

भूतेषु कृतमैत्राय, शुश्रूषाभिरताय च ॥ 41॥

बहिर्जातविरागाय, शान्तचित्ताय दीयताम् ।

निर्मत्सराय शुचये, यस्याहं(म्) प्रेयसां(म्) प्रियः ॥ 42॥

जो अत्यंत श्रद्धाळू, भक्त, विनयशील, दुसऱ्यांविषयी दोषदृष्टी न ठेवणारा, सर्व प्राण्यांशी मैत्री असणारा, गुरूसेवेमध्ये तत्पर, बाह्य विषयांमध्ये अनासक्त, शांतचित्त, मत्सरशून्य आणि पवित्रचित्त असेल, तसेच मला परम प्रियतम मानणारा असेल, त्याला याचा उपदेश करावा.

य इदं(म्) शृणुयादम्ब, श्रद्धया पुरुषः(स्) सकृत् ।

यो वाभिधत्ते मच्चित्तः(स्), स ह्येति पदवीं(ञ्) च मे ॥ 43॥

माते, जो पुरुष माझे ठिकाणी चित्त ठेवून याचे श्रद्धापूर्वक एक वेळ का होईना श्रवण किंवा कथन करील, तो माझ्या परमपदाला प्राप्त होईल.

इति श्रीमद्भागवते महापुराणे पारमहं(म्)स्यां(म्) सं(म्)हितायां(न्)

तृतीये स्कन्धेकापिलेये द्वात्रिं(म्)शोऽध्यायः ॥

ॐ पूर्णमदः(फ्) पूर्णमिदं(म्)पूर्णात्पूर्णमुदच्यते

पूर्णस्य पूर्णमादाय पूर्णमेवावशिष्यते ॥

ॐ शान्तिः(श्)शान्तिः(श्)शान्तिः ॥